बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०१५

नवप्रभा

# दोडामार्ग महाविद्यालयात दीक्षांत समारंभ उत्साहात

दोडामार्ग (न. वा.)

पदवी हा एक शिक्षण प्रक्रियेतील छोटासा टप्पा असून शिक्षण हे आयुष्याच्या अंतापर्यंत घेतले तरी ते अपूर्ण आहे. शिक्षणाने बुद्धीमत्ता, ज्ञान वाढते. निसर्ग, पर्यावरण, झाडे-झुडपे, पशु-पक्षी यांचा आपण मानवतावादी दृष्टीतून विचार करतो का? याचे होकारार्थी उत्तर आपण सुशिक्षित झालो असे म्हणता येईल. प्रत्येकाने निसर्गाचा सन्मान करायला शिकले पाहिजे. निसर्ग हाच विश्वाच्या केंद्रस्थानी आहे. धरणी माता, पर्यावरण यांचा समतोल राखला तरच आपण जिवंत राहू शकतो, याची जाणीव प्रत्येकाला झाली पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. विजय फातर्पेकर यांनी केले. ते तेथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात प्रथमच आयोजित केलेल्या दीक्षांत समारंभात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. यावेळी संस्था सदस्य भाई परमेकर, नियामक समितीचे सदस्य विवेकानंद नाईक, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. दिलीप बर्वे उपस्थित होते.

प्रास्ताविक व स्वागत करताना प्राचार्य डॉ. पाटील यांनी मुंबई शहराच्या विकासाला ऐतिहासिक काळापासून कारणीभूत ठरलेल्या घटकांचे विवेचन करून मुंबई शहर व मुंबई विद्यापीठाचा इतिहास कथन केला. विद्यापीठाचा पहिला दीक्षांत समारंभ १८६१ मध्ये झाला. त्यावेळी बी. ए. परीक्षेत बसलेल्या १० पैकी ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीतील उत्तीर्ण झालेल्या दोन विद्यार्थ्यांत नंतर न्यायाधीश व संस्कृत भाषेचे पंडित झालेल्या म. गो. रानडे यांचा समावेश असल्याची आठवण त्यांनी करून दिली.

प्रा. फातर्फेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. एम. टी. बेग तर आभार प्रा. दिलीप बर्वे यांनी मानले.



विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करताना प्रा. विजय फातर्पेकर. बाजूस अन्य मान्यवर.